
पर्यावरणीय
समस्या
संपादक
डॉ. वसंत सातपुते
डॉ. सुनिता टेंगसे
डॉ. मुकुंदराज पाटील

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth • Dist. Parbhani

ISBN: 978-81-944856-9-8

**पर्यावरणीय समस्या** | डॉ. वसंत सातपुते, डॉ. सुनिता टेंगसे, डॉ. मुकुंदराज पाटील

Paryavarniy Samasya | Eds. - Dr.Vasant Satpute, Dr Sunita Tengse, Dr Mukundraj Patil

© संपादक

**प्रकाशक**

डॉ. कल्याण गांगर्डे,

न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी- ४३१४०१

मोबा. ८३२९०००७३२

Email : nmpublication@gmail.com

Web: www.newmanpublication.com

**मुद्रक**

स्नेहल प्रिंटर्स अंड बुक बायंडर्स, परभणी

मोबा. ९७३०७२१३९३

**मुखपृष्ठ**

डॉ. कल्याण गांगर्डे, परभणी

**अक्षरजुळणी**

स्नेहल प्रिंटर्स अंड बुक बायंडर्स, परभणी

**प्रथमावृत्ती :** २०२०

**मूल्य. ₹ २९९/-**

२२.जागतिक तापमान वाढ :कारणे,परिणाम व उपाययोजना /
जयदीप सोळुंके १०९
२३.प्रदुषण : प्रकार, कारणे, परिणाम आणि उपाय / नरसिंग आ.पवार ११६
२४.व्यावसायीक पर्यावरण काळाची गरज / बी. आर शिंदे १२१
२५.व्यवसायावर पर्यावरणाचे परिणाम करणारे घटक
पवार बी. एस १२४
२६.पर्यावरण जनजागृती काळाची गरज /अंभुरे एस. डी. १२८
२७.ध्वनिप्रदूषण परिणाम आणि उपाय / मानसी स. सरदेशपांडे १३२
२८.जागतिक तापमान वाढीचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम /
शिवकुमार के. पांचाळ १३५
२९.घनकचरा व्यवस्थापनातुन पर्यावरण संवर्धन / सुनिता आ. टेंगसे १३९
३०.पर्यावरण शिक्षण आणि त्याची आवश्यकता
दिपक द. जोगडे, ए. के. फाजगे , ए. पी. बर्वे १४४
३१.प्रदूषण: प्रकार, कारणे, परिणाम / वसंत पां. सरवदे १५०
३२.शाश्वत विकासातून पर्यावरण संवर्धन / अशोक का. जाधव १५४
३३.जलप्रदूषण आणि आरोग्य /एस.जी. अन्सारी १६०
३४.आंतरराष्टीय पर्यावरणीय वाटाघाटी / आंधळे बी व्ही १६३
३५.ध्वनी प्रदुषण : कारणे, परिणाम व उपाय / मा. धो. कच्छवे १६७
३६.औष्णिक विदयुत प्रकल्प आणि पर्यावरण /*सुरेवाड एस.जी* १७२
३७.पर्यावरण संवर्धन काळाची गरज /*सोमवंशी मुक्ता (गंगणे)* १७६
३८.जैवविविधतेचा एक चिकित्सक अभ्यास / सुनंदा भद्रशेटे १८१
३९.पर्यावरणाची हानी : एक गंभीर समस्या /*गोलेकर के.एम.* १८४
४०.मराठी साहित्यातील नैसर्गिक पर्यावरण / श्रीहरी दा.चव्हाण १८८
४१.21 वी सदी की कविता में महानगरिय,पर्यावरणीय विमर्श /
दिग्विजय टेंगसे १९२
४२.वाङ्मयीन पर्यावरण / सखाराम बा. कदम १९९
४३.भारतीय संस्कृति एवं पर्यावरण / व्यास सी.पी. २०३
४४.असंतुलन का असमंजस एवं इक्कीसवीं सदी /कुलकर्णी वनिता २०६
४५.पर्यावरणावर प्रदुषणचे होणारे परिणाम /
जी.एन.सोनटक्के, एस.एस. गव्हाणे २१०

२४

# व्यावसायीक पर्यावरण काळाची गरज

बी. आर शिंदे.
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी

प्रस्तावणा

व्यावसायीक पर्यावरणाचे संरक्षण करणे काळाची गरज आहे. कारण कोणत्याही वयावसाय उद्योग स्थापण्याचा मुख्य उद्देश म्हणजे समाजाला वस्तू आणि सेवांचा पुरवठा करणे हा असतो. म्हणून व्यावसायाची स्थापना होत असताना सभोवतालची परिस्थीती महत्वाची असते. सभोवतालच्या परिस्थीतीचा परिणाम व्यावसाय उद्योगावर होतो. त्याचा व्यावसायाच्या विकासावर परिणाम होतो. तरी पण व्यावसायाच्या सभोवतालची परिस्थीती बदलण्याची क्षमता असते. व्यावसायाचा विकास करताना सभोतालच्या परिस्थीतीचा सिंहाचा वाटा असतो. म्हणून व्यावसायाच्या विकासाकरीता व्यावसायीक पर्यावरणाचा अभ्यास करणे आवश्यक असते. व्यावसायीक पर्यावरणाचा अभ्यास करताना व्यावसायीक पर्यावरणाच्या अनेक घटकांचा अभ्यास करताना त्यात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, नैसर्गिक, तांत्रीक, शैक्षणिक अशा अनेक घटकाचा व्यावसायीक पर्यावरणावर परिणाम होत असतो. त्या घटकांचा अभ्यास आपणास या लेखात करावयाचा आहे.

**व्यावसायीक पर्यावरणावर परिणाम करणारे घटक :** व्यावसायीक पर्यावरणावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत त्या घटकांचा चांगला आणि वाईट परिणाम व्यावसाय उद्योगावर होत असतो. त्याचा अभ्यास या लेखात करताना व्यावसायीक पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थीती या परिस्थितीतून व्यावसाय उद्योग निर्माण होतात. निर्माण झालेल्या व्यावसाय आणि उद्योगाचे जतन करणे त्याना संरक्षण देणे काळाची गरज आहे म्हणून व्यावसाय उद्योगावर परिणाम करणा–या घटकाचा अभ्यास करताना ती घटक खालील प्रमाणे आहेत.

**१ नैसर्गिक घटक :** व्यावसाय उद्योगावर परिणाम करणारा नैसर्गिक हा घटक महत्वाचा आहे. नैसर्गिक घटक म्हणजे नैसर्गिक साधन संपदा होय. ती नैसर्गिक निर्मित असते. म्हणून ती महत्वाची असते. या संपदाचा वापर वीचारपुर्वक करावा लागतो. कारण या मर्यादीत असतात. या घटकावरच व्यावसायाचा विकास अवलंबून असतो. त्या देशात नैसर्गिक सादन संपदा मोठ्या प्रमाणात असते. आणि त्याचा वापर नियंत्रित केला जातो त्या देशातील व्यावसायाचा पर्यायाने देशाचा विकास होतो. त्या घटकाचा योग्य तो वापर केला नाहीतर त्याचा परिणाम व्यावसाय उद्योगावर होऊन देशाच्या विकासावर होतो.

**२ आर्थिक घटक :** व्यावसाय उद्योगावर परिणाम करणारा आर्थिक घटक हा सुद्धा महत्वाचा आहे. भांडवला शिवाय कोणत्याही व्यावसाय उद्योगाचा विकास होत नाही. म्हणून भांडवलाला व्यावसायाची ' रक्त वाहीनी ' म्हटले आहे. व्यावसाय उद्योगाचा विकास करण्यासाठी त्याचा विस्तार करण्यासाठी, आधुनिकीकरण करणयसाठी पैसाची गरज असते. पैसा हा मानव निर्मीत असला तरी तो मर्यादीत असतो. त्याचा योग्य पद्धतीने वापर करावा लागतो. हा घटक

जेवढा सहजतेने उपलब्ध होइल तेवढ्याच सहजतेने व्यावसाय उद्योग संस्थाचा विकास घडून योतो. त्यासाठी व्यावसाय उद्योगाला पैसा पुरवठा करणा–या संस्था म्हणजेच बॅंका, वितसंस्था, सावकार असा सर्व पतपुरवठा करणा–या संस्थानीयोग व्याज दराने कर्जाचा पुरवठ केला तर व्यावसाय उद्योगाचा विकास होउ शकतो. आज प्रगत देशात बॅंकाचे मोठ्या प्रमाणावर बॅंकाचे जाळे उभे केल्यामुळे व्यावसाय उद्योगाला सहज पत पुरवठा होत असलेला दिसतो. त्यामुळे तेथील व्यावसाय उद्योगाला विकासाला चालना मिळाली. भारतात 08 नोव्हेंबर 2016 ला नोट बंदीचा निर्णय घेण्यात आला त्याचा परिणाम भारतीय उद्योगावर झालेला दिसतो. जर आज ही व्यावसाय उद्योगाला भांडवलाचा पुरवठा योग्य प्रमाणात केला तर आर्थिक विकासाला चालना मिळते आर्थिक घटक हा व्यावसाय उद्योगाच्या विकासाचा महत्वाचा घटक मानला जातो. म्हणून देशात जेवढा आर्थिक घटक प्रभावशाली असेल तेवढ्याच प्रभावीपणे व्यावसाय संस्था विकसीत होते. जर आर्थिक घटक कमजोर असेल तर देशातील व्यावसाय उद्योग व देशाची अर्थव्यवस्था अविकसीत राहते.

३ **राजकीय घटक :** व्यावसाय संस्थेवर परिणाम करणारा महत्वाचा घटक आहे. कारण हा घटक देशाच्या अर्थव्यवस्थेची ध्येयधोरणे ठरवीत असतो. व त्याचे नेतूत्व करीत असतो. अनेक कायदे अस्तित्वात असलेले बंद करायचे काही कायद्यात सुधारण करायच्या तर काही नवीन कायदे निर्माण करायची. म्हणून राजकीय सत्ता बदलली की कायद्यामध्ये बदल होतात. त्यात कोणत्या व्यावसायाला चालना द्यावयाची कोणते व्यावसाय बंद करावयाचे हे सर्व निर्णय या घटकावर अवलंबुन असतात. म्हणून हा घटक इतर घटकापेक्षा महत्वाचा आहे. कारण हाच घटक एक व्यावसायीक पर्यावरण निर्माण करून देवू शकतो किंवा चांगले पर्यावरण खराब करू शकतो. म्हणून घ्याच घटकावर देशातील व्यावसायीक व औद्योगीक घडामोडी अवलंबून असतात. तर सरकारची भूमीका सकारात्मक असेल तर व्यावसायीक पर्यावरण अनुकूल राहते. त्याची भुमीका सकारात्मक नसेल तर त्याचा परिणाम व्यावसाय उद्योगावर होवू शकतो.

४ **तंत्रज्ञान विशयक घटक :** तंत्रज्ञानातील बदल व्यावसाय उद्योगावर परिणाम करू शकतात. अलीकडली काळात माहीती तंत्रज्ञान व संगणकाच्या विकासामूळे जवळ जवळ सर्वच क्षेत्रातील बदल झाला आहे. हे बदलते तंत्रज्ञान प्रत्येक व्यावसायीकाला स्विकारून वस्तू आणि सेवाचे उत्पादन करावे लागते. नविन नविन शोध लावावे लागतात. अन्यथा उद्योग काळाच्या वेगात पडद्यामागे पडतात. जगात हे बदल सातत्याने होत असतात. या बदलानुसार बाजारपेठेतील मागणी सुद्धा बदलत असते. त्यानुसार उत्पादन निर्माण करावे लागते. देशातंर्गत बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी तंत्रज्ञानविषयक बदल अंगीकारावे लागतात. तंत्रज्ञानविषयक पर्यावरण व्यावसाय उद्योगातील महत्वाची असते.

५ **सांस्कृतीक घटक :** व्यावसाय उद्योगावर परिणाम करणारा हा महत्वाचा घटक आहे. जेव्हा व्यावसायीक एखाद्या वस्तूचे उत्पादन करतो तेव्हा त्याच्या समोर त्या देशातील संस्कूती येते. कारण कोणत्याही देशाची संस्कृती त्या देशाच्या व्यावसायीक व आद्योगीक परिणाम करते. भारतात अनेक जाती धर्माचे लोक

राहतात. त्या प्रत्येक जाती धर्माच्या लोकांची संस्कृती चालीरीती परंपरा वेगवेगळी असते. म्हणून व्यावसायीकाला देशातंर्गत स्पर्धा करावयाची असल्यास व आपल्या व्यावसायाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी व्यावसायीक पर्यावरणात संस्कृतीक घटक हे महत्वाचे असतात.

**६ अंतरराश्ट्रीय घटक :** अंतरराष्ट्रीय घटक हा सूद्धा व्यावसाय उद्योगाच्या पर्यावरणावर परिणाम करणारा घटक आहे. "सप्टेंबर 2000 ला वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला होता त्याचा परिणाम व्यावसायीक पर्यावरणावर झालेला दिसून येतो. त्याचबरोबर व्यापाराचे जागतीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, आयात–निर्यात जागतीक धोरण, आंतरराष्ट्रीय आतंकावाद याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारात होतो.

**७ व्यावसाय संस्थेतील अंतर्गत घटक :** व्यावसाय उद्योगातील अंतर्गत घटकांचा व्यावसायीक पर्यावरणावर परिणाम होतो. व्यावसायात व्यवस्थापन, नियंत्रण, नियोजण, संचालन अशा अनेक अंतर्गत कार्याचा व्यावसायात समावेश होतो, ही कार्य व्यावसायाचा विकास किंवा नाश करू शकतात. त्याचबरोबर मालक–व्यवस्थापक–कर्मचारी–कामगार इ संबंध सुद्धा व्यावसायीक पर्यावरणावर परिणाम होतो. म्हणून व्यावसायीक पर्यावरणावर परिणाम होतो. म्हणून व्यावसायातील अंतर्गत घटक शुद्धा व्याावसायीक पर्यावरण चांगले ठेवण्यासाठी महत्वपुर्ण असतात.

**निश्कर्श :** व्याव‌यायीक पर्यावरणाचा अभ्यास करता आपणास असे म्हणता येते की आज व्यावसाय उद्योगाकडे समाजाला पाहण्याचा दृष्टीकोण बदललेला दिसतो. कोणत्याही व्यावसाय समाजापासून वेगळा करता येत नाही. म्हणून व्यावसाय उद्योगातील अंतर्गत आणि बाह्य घटक महत्वाची असतात या सर्व घटकांचा योग्य उपयोग केला तर व्यावसायीक पर्यावरण चांगले राहणार नाही. चांगल्या व्यावसायीक पर्यावरणाचा व्यावसायीक विकासासाठी उपयोग होऊ शकतो. किंवा व्यावसायीक पर्यावरणाचा योग्य वापर केला नाही तर व्यावसायीक पर्यावरणाचा –हास होइल.

## संदर्भ


1 पर्यावरण अभ्यास – प्रा. सचिन पेंडसे /अहिरराव
प्रा. निता साने / प्रा. अविनाश अपटे

2 व्यावसाय पर्यावरण – प्रा. डॉ. कल्यान लहाने
प्रा. डॉ. रामदास वनारे


□□□